## सुविचार

आयुष्य म्हणजे संधींचा प्रवास; प्रत्येक अपयश शिकवण देतं, प्रत्येक यश जबाबदारी वाढवतं, आणि संयम, कष्ट, प्रामाणिकपणा जपला तर वाट कितीही कठीण असली तरी ध्येय साध्य होतं.

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## पोर्श प्रकरणी नोटीस

**नवी दिल्ली :** पोर्श अपघात प्रकरणातील आरोपी, आशिष मित्तल आणि आदित्य सूद या दोघांच्या जामीन अर्जांवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली. मद्यधुंद अवस्थेतील अल्पवयीन मुलाने चालवलेल्या पोर्शने दोघांना चिरडल्याच्या या घटनेत, पुराव्यांशी छेडछाड केल्याचा आरोप या दोघांवर आहे. खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या जामीन नाकारण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर नोटीस जारी केली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ८ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १०६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पाकी पंजाबमध्ये अपघातात १० ठार

**लाहोर :** पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात धुक्यामुळे झालेल्या दोन अपघातांमध्ये बुधवारी किमान १० जणांचा मृत्यू झाला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पहिल्या घटनेत, लाहोरपासून सुमारे ३०० किमी अंतरावर असलेल्या चकवाल येथील तलगंगजवळ प्रवासी बस दरीत कोसळल्याने पाच जणांचा मृत्यू झाला तर २७ जण जखमी झाले. ही बस रावळपिंडीहून मुलतानला जात होती.

### २५ वर्षांपासून फरार आरोपीला अटक

**नवी दिल्ली :** पॅरोलमधून बाहेर आल्यानंतर २५ वर्षांपासून फरार असलेल्या एका आरोपीला दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. आरोपी योगिंदर सिंग (५८) याला १९९७ मध्ये दोषी ठरवण्यात आले आणि १९९२ मध्ये त्याच्या पत्नीचा गळा दाबून खून केल्याबद्दल त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. जून २००० मध्ये त्याला चार आठवड्यांसाठी पॅरोलवर सोडण्यात आले, परंतु तो फरार झाला होता.

### भाजपने एमआयएमशी युतीचा विचार करावा

**बेंगळुरू :** येथील नाशिक शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी सांगितले की, एआयएमआयएमशी युती करायची की काँग्रेसशी, याचा विचार भाजपने करायचा आहे, परंतु याला त्यांचा विरोध कायम राहील. गेल्या महिन्यात झालेल्या निवडणुकीनंतर, भाजपने 'अंबरनाथ विकास आघाडी' या बॅनरखाली ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेचे नेतृत्व स्थापन करण्यासाठी त्यांचा कट्टर प्रतिस्पर्धी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी केली आणि मित्रपक्ष शिवसेनेला बाजूला केले.

## आयोगाने अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत यांचे गीत नाकारले

# भाजपाच्या प्रचारगीताला झटका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून तयार करण्यात आलेले प्रचार गीत राज्य निवडणूक आयोगाने मंजूर न केल्याची माहिती समोर आली आहे. निवडणूक आचारसंहितेच्या नियमांशी विसंगत बाबी आढळल्यामुळे हे गीत नाकारण्यात आल्याचे सांगितले जात आहे.**

या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली असून भाजपच्या प्रचार धोरणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आयोगाच्या या भूमिकेकडे सर्व पक्षांचे लक्ष लागले आहे.




राज्यभरात महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच मुंबई महापालिका निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. प्रचारासाठी अवघे सात दिवस शिल्लक राहिले असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सर्वच प्रमुख पक्ष ताकदीनिशी मैदानात उतरले असून सभा, रोड शो आणि घराघरात संपर्क मोहिमा जोरात सुरू आहेत. अशातच मुंबई महापालिकेसाठी भाजपने तयार केलेले विशेष प्रचार गीत राज्य निवडणूक आयोगाने नाकारल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपकडून मुंबई महापालिका निवडणुकीसाठी खास प्रचार गीत तयार करण्यात आले होते. मात्र या गीताला निवडणूक आयोगाने प्रचारासाठी मंजुरी नाकारली आहे. गीतामध्ये 'भगवा' हा शब्द वापरण्यात आल्याने आचारसंहितेचा भंग होत असल्याचा ठपका ठेवत आयोगाने हे गीत फेटाळले आहे. ही बाब मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचाराशी संबंधित असून मुंबईत सुरू असलेल्या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराचे शेवटचे सात दिवस सुरू असताना हा निर्णय जाहीर झाला आहे. याच काळात प्रचार अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. भाजपकडून तयार करण्यात आलेले हे प्रचार गीत प्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत यांनी गायले होते. तर राज्य निवडणूक आयोगाने या गीतावर आक्षेप घेत मंजुरी नाकारली आहे.

आचारसंहितेतील नियमांनुसार प्रचार साहित्यात आक्षेपार्ह किंवा धार्मिक-राजकीय संदर्भ असलेले शब्द वापरण्यास मनाई आहे. 'भगवा' या शब्दप्रयोगामुळे आचारसंहितेचा भंग होत असल्याचे नमूद करत आयोगाने हे गीत वापरण्यास परवानगी दिली नाही. याचा भाजपच्या प्रचार धोरणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पक्षाला आता पर्यायी माध्यमांचा अवलंब करावा लागणार असून, मागील कार्यकाळातील विकासकामांचा दाखला देत प्रचार अधिक आक्रमक करण्यात येत आहे.

## छत्रपती शिवरायांचा अवमान २२ वर्षांनंतर मागितली माफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्याबद्दलचा अवमानकारक मजकूर पुस्तकात छापल्याबद्दल महाराष्ट्रात २००३ साली वादळ निर्माण झाले होते. लेखक जेम्स लेन यांच्या 'शिवाजी: हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' पुस्तकातील मजकूरामुळे मोठा वादंग उठला होता. जेम्स लेन प्रकरण म्हणून या वादाची ओळख असून, तेव्हाचे राजकीय, साहित्यिक, समाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्र ढवळून निघाले होते. २२ वर्षांनंतर आता या पुस्तकाचे प्रकाशक ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने माफीनामा सादर केला आहे.

छत्रपतींचे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांचा उल्लेख या माफीनाम्यात असून त्यांची लेखी माफी मागितली गेली आहे. प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, या पुस्तकात छापून आलेल्या विधानांबद्दल मनापासून वाईट वाटते. या लिखाणामुळे जनभावना दुखावल्या गेल्या. त्याबद्दल आम्ही श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले आणि इतरांची दिलगिरी व्यक्त करत आहोत. जेम्स लेन यांच्या पुस्तकावर त्यावेळी तीव्र नाराजी व्यक्त केली गेली. या पुस्तकासाठीचे संदर्भ ग्रंथ पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संसोधन संस्थेतून मिळवले असल्याचा आरोप काही संघटनांनी केल्यानंतर भांडारकर संस्थेच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आला होता.

## आ. महेश लांडगे यांचा अजित पवारांवर पलटवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराचा जोर वाढला असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

अजित पवारांच्या टीकेला उत्तर देताना महेश लांडगे यांनी वैयक्तिक पातळीवर जात तीव्र शब्दांत टीका केली. पिंपरी-चिंचवडमधील कुत्र्यांच्या नसबंदीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप अजित पवार यांनी जाहीर सभेत केला होता. या आरोपाचा समाचार घेताना लांडगे यांनी, भ्रष्टाचाराचे आरोप करण्यापूर्वी स्वतःच्या विचारांची तपासणी करावी, असे म्हणत पवारांवर टीका केली.

महापालिकेच्या मुदत ठेवी मोडल्याच्या प्रकरणावरूनही लांडगे यांनी अजित पवारांना सवाल केले. अडीच वर्षे जिल्ह्याचे पालकमंत्री असताना कारवाई का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. भ्रष्टाचार झाला असेल, तर त्या वेळीच पावले उचलायला हवी होती, असेही त्यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांची ओळख शरद पवारांमुळे झाली. शरद पवारांनी त्यांना खासदार करून पुढे आणले, हे विसरू नये, असे म्हणत त्यांनी शहराचा मालक होण्याऐवजी लोकसेवक म्हणून काम करण्याचा सल्ला आमदार लांडगे यांनी अजित पवारांना दिला.

## एसआयआर मोहिमेत सुधारणा मसुदा जाहीर

# १२ राज्यांतून ६.५९ कोटी नावे वगळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने उत्तर प्रदेशातील मतदारयादी सुधारणा (एसआयआर) मसुदा यादी जाहीर केल्यानंतर १२ राज्यांमधील या प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू झालेली मतदारयादी दुरुस्ती मोहीम तब्बल दोन महिने ११ दिवस चालली. या प्रक्रियेनंतर मसुदा मतदारयादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आली आहेत.

एसआयआरपूर्वी या १२ राज्यांमध्ये एकूण ५०.९७ कोटी मतदार नोंदणीकृत होते. पडताळणी प्रक्रियेनंतर ही संख्या घटून ४४.३८ कोटींवर आली आहे. यामुळे सुमारे ६.५९ कोटी मतदारांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली असून, हे प्रमाण एकूण मतदारसंख्येच्या १२.९३ टक्के इतके आहे. म्हणजेच प्रत्येक १०० मतदारांमागे सरासरी १३ नावे वगळण्यात आली आहेत.

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये सुमारे ७.५ टक्के मतदारांची नावे वगळण्यात आली असून, साधारणपणे प्रत्येक १३ पैकी एक मतदार यादीबाहेर गेला आहे.

ही अंतिम यादी नसून, ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत त्यांना दावा व हरकत नोंदवण्याची संधी देण्यात आली आहे. फॉर्म ६ किंवा ७ भरून मतदारांना नावे जोडणे किंवा दुरुस्ती करता येणार आहे.

उत्तर प्रदेशात सर्वाधिक नावे वगळण्यात आली असून, प्रत्येक १०० मतदारांपैकी १९ नावे यादीतून काढण्यात आली आहेत. याउलट लक्षद्वीपमध्ये ही संख्या अत्यल्प असून, फक्त तीन टक्के नावे वगळण्यात आली आहेत.

पश्चिम बंगालमध्ये आठ टक्के, गुजरातमध्ये १५ टक्के, तर छत्तीसगडमध्ये १३ टक्के मतदारांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली आहेत. राजस्थानमध्ये एसआयआर मसुदा यादीतून ४१.८५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. मसुदा यादीपूर्वी राज्यात ५.४८ कोटी मतदार होते, तर मसुदा यादीत ५.०६ कोटी मतदारांचा समावेश आहे.

मध्य प्रदेशात मसुदा यादीतून ४२.७४ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. यामुळे राज्यातील मतदारसंख्या ५.७४ कोटींवरून ५.३१ कोटींवर आली आहे.

पश्चिम बंगालमध्ये ५८.२० लाख नावे वगळण्यात आली असून, मतदारसंख्या ७.६६ कोटींवरून ७.०८ कोटी झाली आहे. गुजरातमध्ये ७३.७३ लाख मतदारांची नावे काढण्यात आली असून, राज्यातील मतदारसंख्या ५.०८ कोटींवरून ४.३४ कोटी झाली आहे.

तामिळनाडूमध्ये ९७ लाख मतदारांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली आहेत. यापैकी २६.९५ लाख मृत, ३.३४ लाख डुप्लिकेट किंवा बनावट, तर ६६.७ लाख मतदार स्थलांतरित, बेपत्ता किंवा अन्य कारणांनी अपात्र ठरले आहेत. या राज्यात वगळण्याचे प्रमाण १५.१३ टक्के आहे. इतर राज्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आली आहेत. छत्तीसगडमध्ये २.१२ कोटी, केरळमध्ये २४.०८ लाख, गोव्यात १.१० लाख, पुद्दुचेरीमध्ये १.३० लाख, अंदमान-निकोबारमध्ये ६४ हजार, तर लक्षद्वीपमध्ये ५८ हजार मतदारांपैकी १.६ हजार नावे यादीतून वगळण्यात आली आहेत.

निवडणूक आयोगाच्या या कारवाईमुळे मतदारयादी अधिक अचूक करण्याचा दावा करण्यात येत असला, तरी मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## अर्थव्यवस्था ७.४ टक्के दराने वाढणार

### सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचा अहवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उत्पादन आणि सेवा क्षेत्रांच्या सुधारित कामगिरीच्या जोरावर चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ७.४ टक्के दराने वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बुधवारी, ७ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार हा वाढीचा दर मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नोंदवलेल्या ६.५ टक्के वाढीपेक्षा अधिक आहे.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रांमध्ये सुमारे सात टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे.

मंत्रालयाच्या मते, या कालावधीत भारताचा वास्तविक सकल देशांतर्गत



उत्पादन (जीडीपी) ७.४ टक्के दराने वाढेल.

नाममात्र आधारावर विचार करता, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जीडीपीमध्ये आठ टक्क्यांची वाढ होण्याचा अंदाज आहे. हा पहिला आगाऊ अंदाज महत्त्वाचा मानला जातो, कारण केंद्र सरकार दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्प तयार करताना या आकडेवारीचा आधार घेत धोरणात्मक निर्णय घेत असते.

मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की २०२५-२६ या आर्थिक वर्षात वास्तविक सकल मूल्यवर्धित ७.३ टक्के दराने वाढण्याची शक्यता असून, यामागे सेवा क्षेत्रातील मजबूत कामगिरीचा मोठा वाटा आहे. मात्र, कृषी व संलग्न क्षेत्रे तसेच वीज, वायू, पाणीपुरवठा आणि इतर लोककेंद्रित सेवा क्षेत्रांमधील वाढ तुलनेने मध्यम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सध्याच्या किमतींनुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन आठ टक्के दराने वाढेल, असेही मंत्रालयाने नमूद केले आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचे हे आगाऊ अंदाज आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तयारीसाठी महत्त्वाचे ठरतात. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर होण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्राच्या जडणघडणीत विलासरावांचा मोठा वाटा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लातूर :** लातूरमध्ये विलासराव देशमुखांबाबत पुन्हा वाद निर्माण झाला होता. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी काही वक्तव्य केले होते, ज्यात त्यांनी लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील, असे म्हटले होते. या वक्तव्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर टीका केली होती. विलासराव देशमुख हे सर्वपक्षीय सलोख्याचे नेते मानले जातात आणि त्यांच्या विरोधात अशा शब्दांचा वापर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाला पसंत पडला नाही.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरमध्ये झालेल्या सभेत स्पष्ट केले की विलासराव देशमुखांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे आणि त्यांच्याविषयी त्यांना पूर्ण आदर आहे. त्यांनी सांगितले की लातूर ही अशी भूमी आहे जिथे महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर नेतृत्व मिळाले आहे. यामध्ये चाकूरकर साहेब, शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा समावेश होतो. अशा नेत्यांचा राजकारणात मोठा वाटा असून त्यांच्या विषयी आदर ठेवणे आवश्यक आहे.

फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वीच्या संभ्रमाचा संदर्भ घेत सांगितले की आमचे अध्यक्ष लातूर येथे आले होते आणि राजकीयदृष्ट्या नवीन रेकॉर्ड तयार करण्याचा प्रयत्न करत होते. कदाचित त्यांच्या शब्दांचा अर्थ चुकीच्या पद्धतीने समजला गेला असेल. मात्र त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आणि सांगितले की आमची लढाई काँग्रेसशी असली तरी विलासराव देशमुखांबाबत आदर आहे, असेही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर आता बघणे महत्वाचे ठरणार आहे की लातूरमधील काहीसे दुखावलेले लोक शांत होतील की नाही, कारण निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय संवेदनशीलता अधिक वाढलेली आहे.

## भाजपा हा दगाफटका करणारा पक्ष

### उद्धव ठाकरे यांची जोरदार टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वाद, आरोप आणि भाषणांचा उधाण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीका केली आणि महायुतीतील परिस्थितीवर आपले विचार मांडले.

उद्धव ठाकरे म्हणाले की दोन शिवसेना नाहीत. आमची शिवसेनाच खरी शिवसेना आहे. दुसरी आहे ती शाहसेना. शिवसेना म्हणजे स्वाभिमानी आणि अभिमानी संघटना. शाखाभेटी देताना सुद्धा गहिवरून येते. शिवसेना फुटलेली नाही. गद्दार सेनेला कुणी शिवसेना म्हणत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजपाविरोधात त्यांनी सांगितले की, दगाफटका करणं हा भाजपाचा स्थायीभाव आहे. त्यांच्याबरोबर मी कधीही जाणार नाही. पूर्वी



निवडणुकीचा आखाडा होता, आता भाजपाने त्याचा 'हमाम' करून ठेवला आहे. एकनाथ शिंदे आणि भाजपावर टीका करत त्यांनी म्हटले की न्यायप्रविष्ट वाद किती वर्षे राहणार आणि लोकशाहीचा खून होत राहिला तर काय होणार? आत्ता जे काही चाललंय त्याला राजकारण म्हणता येणार नाही. ते गजकर्ण आहे. फक्त खुजवत बसले आहेत, कारण खुर्चीसाठी संघर्ष आहे. भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे, पण तो वांझोटा पक्ष आहे. पक्षात सगळे उपरेच आहेत, निष्ठावंतांवर अन्याय होत आहे. नाशिकमध्ये आणि मुंबईत काय घडलं ते पाहिलं आहे. देवयानी फरांदे रडल्या तरीही त्यांच्या डोक्यावर उपरे बसवले गेले, असेही त्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगावरही त्यांनी टीका केली. ज्या ठिकाणी बिनविरोध निवडणुका झाल्या किंवा केल्या, त्याचा काही अर्थ नाही. मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जातो. आम्ही फेरनिवडणुकीची मागणी केली, पण निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांचा गुलाम आहे, असा आरोप त्यांनी केला.

भाजपावर टीका करत उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपा हा दगाफटका करणारा पक्ष आहे. महायुतीत विरोधकांची जागा भाजपाने व्यापली आहे. २०१४ ला युती तोडली, २०१९ ला आम्हाला दगा दिला. दगाफटका करणाऱ्यांसह मी पुन्हा जाणार नाही. मला जनतेशी दगा फटका करायचा नाही, असेही ते म्हणाले.

## ऑपरेशन सिंदूर दरम्यानची घटना उघडकीस

# पाकिस्तानने मदतीसाठी अमेरिकेपुढे केली होती याचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्तानने मदतीसाठी अमेरिकेपुढे याचना केली असल्याची बाब अमेरिकन सरकारच्या कागदपत्रांतून उघड झाली आहे. या माहितीमुळे पाकिस्तानचा खोटा प्रचार आणि चुकीची माहिती प्रसारित करण्याच्या मोहिमेतील खोटारडेपणा उघड झाला आहे.

ऑपरेशन सिंदूर हे काही काळासाठी थांबवण्यात आले आहे आणि पाकिस्तानच्या भूभागावरील हल्ले पुन्हा सुरू होऊ शकतात अशी चिंता पाकिस्तानला होती, अशी




माहिती अमेरिकेच्या 'फॉरेन एजंट्स रजिस्ट्रेशन ॲक्ट' अंतर्गत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमधून उघड झाली आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने मे २०२५ मध्ये 'ऑपरेशन सिंदूर' ही लष्करी मोहीम राबवण्यात आली होती. पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानचे पाठबळ असलेल्या दहशतवाद्यांनी २६ नागरिकांची हत्या केली होती. यानंतर ही लष्करी मोहिम प्रत्युत्तरादाखल सुरू करण्यात आली होती.

७ मे रोजी करण्यात आलेल्या हल्ल्यात पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला होता. या कारवाईमुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात काही काळासाठी संघर्ष पेटला होता, अखेर १० मे रोजी दोन्ही देशांमध्ये शस्त्रविरामावर एकमत झाले. आम्हाला काळजी वाटते आहे की, पंतप्रधान मोदी यांनी भारताने आपली लष्करी कारवाई फक्त स्थगित केली असल्याचे म्हटले आहे आणि पाकिस्तानवर पुन्हा हल्ले सुरू होऊ शकतात, असे पाकिस्तानची लॉबी फर्म स्क्वेयर पॅटन बॉग्सने ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानच्या वतीने जारी केलेल्या कागदपत्रांमध्ये म्हटले आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने शस्त्रविरामाची मागणी केली होती या पाकिस्तानच्या दाव्याची पोलखोल देखील या कागदपत्रांमधून झाली आहे. प्रत्यक्षात ही विनंती पाकिस्तानी लष्कराच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती, ज्यांना त्यांचे मोठे नुकसान होईल याचा अंदाज होता.

मे महिन्यात पंतप्रधान मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर हे फक्त स्थगित करण्यात आले आहे असे स्पष्ट केल्यानंतर, भारताकडून हल्ले पुन्हा सुरू होतील या भीतीने अखेरचा पर्याय म्हणून पाकिस्तानने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे मदत मागीतली होती.

अमेरिकेतली अशाच कागदपत्रांमुळे यापूर्वी वॉशिंग्टनमधील पाकिस्तानच्या प्रचंड 'लॉबिंग' मोहिमेचा पर्दाफाश झाला होता. पाकिस्तानी मुत्सद्दी आणि संरक्षण अधिकाऱ्यांनी अमेरिकेतील खासदार आणि प्रशासनातील वरिष्ठ व्यक्तींबरोबर ५० हून अधिक बैठका घेण्याचा प्रयत्न केला होता, असे वृत्त माध्यमांनी या कागदपत्रांच्या हवाल्याने दिले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सातत्याने आपण भारत-पाकिस्तान संघर्षामध्ये मध्यस्थी केल्याचे दावे केले आहेत, मात्र याउलट भारताने अमेरिकेकडे कधीही हस्तक्षेपाची मागणी केली नाही किंवा अधिकृत चर्चांमध्ये कधीही युद्धविरामचा विषय काढला नाही, याला एका कागदपत्रांमुळे दुजोरा मिळाला आहे.

## ७२ तासांत तीन पक्ष!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**उल्हासनगर :** उल्हासनगरमधील प्रभाग क्रमांक १५ मध्ये अवघ्या ७२ तासांत घडलेल्या एका प्रकाराने महापालिका निवडणुकीतील राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपूर्ण पॅनेलने ऐनवेळी अर्ज मागे घेत, शिवसेनेला पाठिंबा दिल्याने खळबळ उडाली. पक्षनिष्ठा, तत्त्व आणि विचारधारा यापेक्षा संधी महत्त्वाची ठरते का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

या प्रभागात नीलेश बोबडे, रवी वसिटा, सुरज कारकर आणि एक महिला उमेदवार हे सत्ताधारी भाजपचे कार्यकर्ते होते. पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी बंडखोरी केली व राष्ट्रवादीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला; परंतु अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी या चारही उमेदवारांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेत, थेट शिवसेनेला पाठिंबा जाहीर केला. परिणामी, प्रभाग क्रमांक १५ मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे संपूर्ण पॅनलच निवडणूक रिंगणातून बाहेर पडले.

अर्ज मागे घेण्याबाबत सुरज कारकर म्हणाले की, आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधून अर्ज भरला होता, पण अर्ज मागे घेतल्यामुळे कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर त्याबद्दल आम्हाला खेद आहे. तसेच शिवसेनेचा आणि आमचा दृष्टिकोन एकच असल्याने आम्ही हा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, या पॅनलमधील काही उमेदवारांनी अवघ्या दोन दिवसांत भाजप - राष्ट्रवादी अजित पवार गट- शिवसेना शिंदे गट असा राजकीय प्रवास केल्याची चर्चा शहरात रंगली आहे. या घटनेमुळे निवडणुकीतील पक्षनिष्ठा, विचारसरणी आणि राजकीय नैतिकता या संकल्पनांवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# संपादकीय

## उतरंडीतील न्यायदान

**उमर खालिद यांना जामीन नाकारताना न्यायालयाने आरोपींच्या भूमिकांची उतरंड मांडली आहे. दोष अद्याप सिद्ध न होता, खटला सुरू न होता, स्वातंत्र्य नाकारले जाते, तेव्हा जामीन हा नियम असल्याचा दावा कागदावरच राहतो. हा निर्णय केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही, तर तो न्यायाचा आहे.**

उमर खालिद याला जामीन नाकारताना सर्वोच्च न्यायालयाने एक नवा शब्दप्रयोग न्यायव्यवहारात रूढ केला आहे. आरोपींच्या भूमिकांची उतरंड. म्हणजे गुन्हा एकाच प्रकरणातला, पण दोषाची पातळी वेगवेगळी. काहींना जामीन, काहींना नाही. हा भेद कशाच्या आधारे, तर कथित कटातल्या वरच्या पातळीवरील सहभागावर. मात्र, प्रमुख अडचण ही आहे की, हा सहभाग अद्याप सिद्ध झालेला नाही. खटलाही सुरू झालेला नाही. साक्षीदार तपासले गेलेले नाहीत. तरीही न्यायालयाने एका नागरिकाच्या स्वातंत्र्यावर पूर्णविराम देताना आपल्याच तत्त्वांना बाजूला ठेवले आहे. दिल्ली दंगलींना पाच वर्षे झाली. उमर खालिद पाच वर्षांपासून तुरुंगात आहे. ही पाच वर्षे शिक्षा म्हणून त्याने भोगलेली नाहीत कारण दोष सिद्ध झालेला नाही. ही केवळ अटक आहे. अटक इतकी दीर्घकाळ चालली, तर शिक्षा आणि अटक यातील फरक केवळ शब्दकोशापुरताच मर्यादित राहतो. न्यायव्यवस्थेने हा प्रश्न स्वतःला विचारायला हवा. जामीन हा नियम आणि तुरुंग हा अपवाद, हे वाक्य न्यायालये वारंवार उच्चारतात. पण ते केवळ निवाड्याच्या प्रस्तावनेत शोभून दिसावे म्हणूनच असते का? कारण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र याचा अर्थ उलटाच लावलेला दिसून येतो आहे. विशेषतः बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा लावला की जामीन नाकारण्याची वाट सोपी होते. पुरावे तपासण्याआधीच संशयाला दोषाचे स्वरूप दिले जाते. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे मानले की, काही आरोपींची भूमिका दुय्यम होती, तर खालिद याची भूमिका मुख्य होती. हा निष्कर्ष कोणत्या कसोटीवर काढला गेला, हा प्रश्न त्याचवेळी अनुत्तरित आहे. आरोपपत्रात जे लिहिले आहे, तेच अंतिम सत्य मानायचे का? तपास यंत्रणांनी जे सांगितले, तेच पुरावा म्हणून ठरवायचे का? तसे असेल, तर मग खटल्याची गरजच काय? न्यायालयानेच अनेक वेळा सांगितले आहे की आरोपपत्र म्हणजे अंतिम सत्य नसते. तरीही जामीन नाकारताना त्याच आरोपपत्रातील कथनांवर भर दिला जातो. हे विसंगत नाही का? एखाद्याने भाषण केले, लेख लिहिला, चर्चा केली, यावरून तो हिंसाचाराचा सूत्रधार ठरतो, असा निष्कर्ष काढला जात असेल, तर उद्या कोण सुरक्षित राहील? याहून मोठा प्रश्न असा की न्यायालये आता विचारधारेलाही गुन्हा ठरवू लागली आहेत का? सरकारविरोधी भूमिका, आंदोलकांशी जवळीक, सत्तेला अप्रिय मतप्रदर्शन हे सगळे एकत्र करून त्याला कट संबोधणे कितपत योग्य आहे? लोकशाहीत असहमती ही गुन्हा नसते. ती लोकशाहीची गरज असते. पण तीच तुरुंगाची वाट दाखवू लागली, तर लोकशाहीचा आत्मा कैद केल्यासारखीच ती घटना ठरते. न्यायालयाने या निर्णयात आणखी एक गंभीर बाब दुर्लक्षित केली आहे आणि ती म्हणज खटल्याचा झालेला विलंब. हजारो साक्षीदार, शेकडो कागदपत्रे आणि तरीही सुनावणी कधी सुरू होईल हे सांगता येत नाही. अशा परिस्थितीत जामीन नाकारणे म्हणजे आरोपीला अनिश्चित काळासाठी तुरुंगात ठेवण्याचा अधिकृत निर्णयच ठरतो. हे खचितच न्यायालयीन संवेदनशीलतेचे लक्षण नाही. उमर खालिद याचा खटला हा एकमेव नाही. अशा अनेक प्रकरणांत नागरिक वर्षानुवर्षे तुरुंगात आहेत. न्यायालये या वास्तवाकडे दुर्लक्ष करत राहिली, तर न्याय मिळेल ही आशाच संपुष्टात येते. न्यायालये ही निव्वळ कायद्याचे रक्षक नसतात, ती न्यायाची अखेरची आशा असतात. मात्र, हीच न्यायालये भूमिकांच्या उतरंडीत अडकली, तर सामान्य नागरिकाने कुठे जायचे? हाच प्रश्न आहे.

# केंद्र आणि राज्य अर्थकारणाचा कस

**केंद्र आणि राज्य सरकारांच्या वाढत्या खर्च-तुटवड्याने भारताच्या अर्थव्यवस्थेसमोर कठीण आव्हान उभे केले आहे. अपुरे उत्पन्न , वाढते कर्ज आणि राजकीय लोकप्रियतेसाठीचा खर्च वाढत असताना आर्थिक शिस्त, समन्वय आणि दूरदृष्टी यांची नितांत गरज अधोरेखित झाली आहे.**



भारताच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना, काही वर्षांत विविध संकट काळातली वाढलेली महागाई, महामारीनंतरची मंदी आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील धक्के यांनी आपल्या आर्थिक आरोग्याची परीक्षा घेतली. आता मात्र परिस्थिती अशी आली आहे की, केंद्र व राज्य सरकारांच्या खाती दीर्घकाळ टिकणाऱ्या संकटातून वर येण्याऐवजी अधिक खोलात गेल्यासारखी परिस्थिती दिसून येत आहे. केंद्र आणि राज्यांच्या खर्चाचे प्रमाण, उत्पन्नाची पातळी, कर्जाचा बोजा आणि गुंतवणुकीचा मार्ग याबाबत कठोर पुनर्विचाराची गरज तीव्र झाली आहे. केंद्र सरकारच्या आर्थिक स्थितीकडे नजर टाकली, तर वर्षाच्या मध्यावरच खर्चाचे ओझे अपेक्षेपेक्षा अधिक वाढलेले दिसते. व्याजभरणा तसेच सामाजिक व पायाभूत योजनांवरील अनियंत्रित खर्चामुळे तुटवडा वाढत असल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. शासनाचा खर्च आणि उत्पन्नातील अंतर म्हणजेच राजकोषीय तुट वाढू लागली की अर्थव्यवस्थेचा समतोल ढासळतो. राज्य सरकारांची आर्थिक अवस्था याहून वेगळी नाही. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मूलभूत क्षेत्रांवरील खर्च वाढवत असतानाच, आता त्यांना वाढत्या कर्जाचा भार सोसावा लागत आहे. मिळणारा निधी अपुरा ठरत असल्याने, कर संकलन वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत; मात्र त्यासाठी आवश्यक कायदे, संस्थात्मक सुधारणा आणि संपत्ती निर्माणाला पोषक वातावरण अनेक ठिकाणी अभावानेच दिसते. परिणामी राज्यांना बाजारातून कर्ज उभे करावे लागते, तेही अधिक व्याजदराने, ज्यामुळे खर्च वाढतो आणि कर्जफेडीचा ताण अधिकच घट्ट होतो. राज्य सरकारांच्या वाढत्या कर्जाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे झाले आहे. काही राज्यांत कर्जाचे प्रमाण त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या मोठ्या वाट्याइतके झाले आहे. अशी स्थिती निर्माण झाली की खर्चाला कात्री लावणे हे अपरिहार्य ठरते आणि सामाजिक विकासाच्या योजना पुढे ढकलल्या जातात. केंद्र आणि राज्य पातळीवर उत्पन्न वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. कर संकलन वाढवणे, अनावश्यक खर्च कमी करणे, मालमत्तांचा योग्य वापर सुनिश्चित करणे आणि सरकारी योजनांमध्ये स्पष्टता आणणे हे प्राथमिक उपाय असले पाहिजेत. मात्र सध्याच्या राजकीय स्पर्धेच्या वातावरणात तात्पुरत्या लाभ देणाऱ्या योजना अधिक महत्त्वाच्या ठरत आहेत. जेव्हा खर्च वाढतो आणि उत्पन्न घटते, तेव्हा तुटवडा वाढतो. तुटवडा वाढला की शासनाला अतिरिक्त कर्ज घेणे भाग पडते. कर्जाला व्याज हे भरावेच लागते, अशावेळी शासनाच्या खर्चातील मोठा हिस्सा हा व्याजाची भरपाई करण्यासाठीच खर्ची पडतो. यामुळे सामाजिक, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या गरजेच्या कार्यक्रमांसाठी निधीची चणचण भासू लागते. राज्य आणि केंद्राच्या आर्थिक धोरणांमध्ये समन्वय हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. भारत एक संघराज्य असून केंद्र आणि राज्यांनी मिळून आर्थिक निर्णय घ्यायला हवेत. मात्र प्रत्यक्षात कर वाटप, निधीचे वितरण आणि योजनांचे अंमलबजावणीवर मतभेद निर्माण होतात. त्यामुळे काही राज्यांना स्वतःच्या प्राधान्यक्रमांसाठी निधीपुरवठा कमी पडतो आणि त्यांना केंद्रीय निधीवर अधिक अवलंबून राहावे लागते. हा अवलंबित्वाचा चक्रव्यूह आर्थिक स्वावलंबनाला बाधक ठरतो. याशिवाय, मूल्यवर्धित कर हा एक महत्त्वाचा महसूल स्रोत आहे, पण त्याचे योग्य वाटप आणि कर आकारणीच्या दरांचा समतोल राखणे हा मोठा आव्हान आहे. काही क्षेत्रांत कर संकलन अपेक्षेइतके होत नाही, तर काही भागांत वाढलेला करभार उद्योगधंद्यांवर ताण निर्माण करतो. या सर्व बाबींचा विचार करूनच अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन स्थिरतेकडे नेणारे धोरण आखणे गरजेचे आहे. भविष्यातील आर्थिक वाढीसाठी प्रभावी उपाययोजना राबवायच्या असतील, तर खर्चाचे नियोजन, कर धोरणे, गुंतवणूक वाढवणे आणि कर्ज व्यवस्थापन यावर लक्ष देणे नितांत गरजेचे आहे. दीर्घकालीन प्रकल्प आणि योजना प्राधान्याने राबवाव्यात. निर्णय घेताना केवळ राजकीय स्वार्थ न पाहता, देशाची आर्थिक स्थिरता, संतुलन आणि भविष्याच्या वाढीची दृष्टी प्रामुख्याने ठेवणे आवश्यक. जगभरातील अर्थव्यवस्थेत टिकून राहण्याचा विचार करत असताना, आपल्या घरची खाती संकुचित होत असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे केंद्र आणि राज्यांनी एकत्र येऊन असे धोरण आखले पाहिजे, जे फक्त खर्च व कर्ज कमी करणार नाही, तर दीर्घकालीन आर्थिक आरोग्य सुधारण्यासही ते मदत करेल.

यासाठी पहिले पाऊल म्हणजे खर्चात काटकसर करणे, उत्पन्न वाढविणे आणि कर संकलन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करणे. हे बदल सहजसोपे नाहीत; पण आज त्याकडे दुर्लक्ष केले, तर उद्याच्या दिवसात लोकांच्या अपेक्षा आणि शासनाच्या क्षमतांमधील तफावत अधिक वाढत जाईल. केंद्र आणि राज्यांनी एकत्र येऊन आजचा कठोर निर्णय हा उद्याचे शाश्वत आर्थिक भविष्य या पद्धतीने राबवावा. अन्यथा, आर्थिक ताण हा वाढतच जाईल आणि त्याची थेट झळ ही जनतेला बसेल.

# मतदान जनजागृतीसाठी अभिनव उपक्रम

## रील व मिम्स स्पर्धेद्वारे युवकांचा सर्जनशील सहभाग वाढवणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा भाग म्हणून मतदान जनजागृतीसाठी नागरिकांच्या सर्जनशीलतेला वाव देणारी रील स्पर्धा तसेच मिम्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.



लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. मतदानाचे महत्त्व अधिक प्रभावी आणि आधुनिक माध्यमांतून नागरिकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः युवकांनी डिजिटल आणि सर्जनशील माध्यमांचा वापर करून मतदानाबाबत सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, अशी अपेक्षा महापालिकेने व्यक्त केली आहे.

रील स्पर्धेसाठी प्रत्येक सहभागी नागरिकाला एका प्रवेशासाठी एकाच रीलला परवानगी देण्यात आली आहे. रील पूर्णतः राजकीय आशयविरहित असून आदर्श आचारसंहितेचे पालन करणारी असणे आवश्यक आहे. रीलची कालावधी १५ ते ३० सेकंद इतकी असावी. ती ९:१६ या आस्पेक्ट रेशोमध्ये, MP4 फॉरमॅटमध्ये सादर करणे बंधनकारक आहे. रीलमध्ये कोणतेही लोगो, कॉपीराइट चिन्हे अथवा अनधिकृत मजकूर वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच सहभागी नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अधिकृत सोशल मीडिया पेज फॉलो करणे आवश्यक आहे. याशिवाय आयोजित करण्यात आलेल्या मिम्स स्पर्धेसाठीही ठराविक नियम व अटी लागू करण्यात आल्या आहेत. एका प्रवेशासाठी एका मिम्सला परवानगी देण्यात आली असून तो मिम्स राजकीय आशयविरहित व आदर्श आचारसंहितेचे पालन करणारा असणे आवश्यक आहे. मिम्समध्ये कोणतेही लोगो, कॉपीराइट चिन्हे किंवा अनधिकृत मजकूर वापरण्यास मनाई आहे. सर्व सहभागी नागरिकांनी महापालिकेचे अधिकृत सोशल मीडिया पेज सर्व प्लॅटफॉर्मवर फॉलो करणे बंधनकारक आहे.

या उपक्रमातून मतदान प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा, तसेच लोकशाहीविषयी सकारात्मक संदेश समाजात अधिक प्रभावीपणे पोहोचावा, असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे. युवकांच्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित होईल, असे मत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी व्यक्त केले आहे.

# कोयता हवेत फिरवून दहशत; काळेवाडीत दोघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** काळेवाडी परिसरात मध्यरात्री सार्वजनिक रस्त्यावर धारदार कोयते हवेत फिरवून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना सोमवार (दि. ५ जानेवारी) रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण कॉलनी, काळेवाडी येथे घडली.

गणेश संजय जाधव (वय २६, रा. गवते चाळ, पिंपरी) आणि शुभम सुरेश गायकवाड (वय ३२, रा. श्रीकृष्ण कॉलनी, काळेवाडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रमेश खेडकर यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरात शस्त्रबंदीचा आदेश लागू असतानाही आरोपींनी बेकायदेशीरपणे प्रत्येकी एक असे सुमारे एक हजार रुपये किमतीचे दोन लोखंडी कोयते बाळगले होते. हे आरोपी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना धमकावत कोयते हवेत फिरवत होते. तसेच "आम्ही येथील भाई आहोत" असे ओरडून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत सार्वजनिक शांततेचा भंग करत होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कोयते जप्त करण्यात आले असून, आरोपींविरोधात शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन व सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काळेवाडी पोलीस पुढील तपास करत असून, परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली आहे.

# पुण्यातील हॉटेलमध्ये सिलेंडरचा भीषण स्फोट; ९ कामगार भाजले, मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** दौंड-पाटस रोडवरील हॉटेल जगदंबा येथे मंगळवारी दुपारी अचानक गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाल्याने परिसरात खळबळ उडाली. या दुर्घटनेत हॉटेलमध्ये काम करणारे नऊ कामगार गंभीररीत्या भाजले असून स्फोटामुळे हॉटेलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास हा स्फोट झाला. स्फोट इतका तीव्र होता की त्याचा आवाज दूरवर ऐकू गेला. काही क्षणांतच हॉटेलमध्ये आग पसरली. स्फोटाच्या वेळी किचनमध्ये दहा ते अकरा गॅस सिलेंडर असल्याची माहिती आहे. स्फोटामुळे हॉटेलवरील पत्रे उडून गेली, तर ग्राहक बसण्याच्या भागातील काचा, खिडक्या फुटल्या. टेबल, खुर्च्या तसेच स्वयंपाकघरातील भांडी अस्ताव्यस्त पडली.

जखमींपैकी तीन कामगारांना दौंड येथील खासगी रुग्णालयात, तर सहा कामगारांना पुढील उपचारासाठी पुण्यात हलविण्यात आले आहे. सुदैवाने स्फोटाच्या वेळी हॉटेलमध्ये ग्राहक नसल्याने मोठी जीवितहानी टळली.

# निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन-पोलिसांचा समन्वय आवश्यक

## पिंपरी-चिंचवड निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संयुक्त बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक शांततेत, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासनाने परस्पर समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले. तर निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे आणि नागरिकांचा विश्वास जपणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर सामूहिक जबाबदारी असल्याचे महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी नमूद केले.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त कार्यालयात महापालिका प्रशासन व पोलिस प्रशासन यांची संयुक्त आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांच्यासह पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली, सारंग आवाड, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उत्पादन शुल्क अधिक्षक अतुल कानडे, उपजिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया डांगे, प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर यांच्यासह महापालिका व पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी निवडणूक तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. मतदान केंद्रांवरील सुविधा, मनुष्यबळ व्यवस्थापन, वाहतूक नियोजन व तांत्रिक बाबींवर भर देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर पोलिस प्रशासनाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या बंदोबस्ताची माहिती देण्यात आली. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले की, महापालिका निवडणूक ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी असते. प्रत्येक टप्पा नियमबद्ध, वेळेत व पारदर्शकपणे पूर्ण करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने नागरिकांना सुरक्षित वातावरण देण्याचा प्रशासनाचा ठाम निर्धार आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. शांततापूर्ण मतदानासाठी आवश्यक तेवढा बंदोबस्त, गस्त आणि तांत्रिक निगराणी ठेवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शहरातील प्रत्येक घराचे मोफत ड्रोन मॅपिंग

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मोठी घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड प्राधिकरण क्षेत्रातील प्रत्येक घराचे मोफत ड्रोन मॅपिंग करण्यात येणार असून महापालिका निवडणुकीनंतर सर्व प्राधिकरणबाधित नागरिकांना बांधकाम व मिळकतींचे मालकी हक्क प्रमाणपत्र म्हणजेच 'प्रॉपर्टी कार्ड' देण्यात येणार आहे, अशी मोठी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली. या निर्णयामुळे लाखो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १७, २३ व २४ मधील उमेदवारांसाठी वाल्हेकरवाडी व थेरगाव येथे आयोजित जनसंवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी पिंपरी-चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीसाठी संबंधित प्रभागांतील भाजपचे उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत सातत्याने प्रॉपर्टी कार्डचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर राज्यात तुकडा बंदी कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे गुंठा, दीड गुंठा अशा छोट्या जागांवर बांधलेल्या घरांची शासन दरबारी नोंदणी शक्य झाली आहे. महापालिका निवडणुका पार पडल्यावर आमदार जगताप यांच्या मागणीनुसार शहरातील सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड दिले जाईल. या प्रॉपर्टी कार्डचे वाटप करण्यासाठी मी स्वतः पिंपरी-चिंचवडमध्ये येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. बावनकुळे यांनी पुढे सांगितले की, शहरातील प्रत्येक प्लॉट व घराचे ड्रोन मॅपिंग करून त्याचा सरकारी नकाशा गुगल क्लाऊडवर उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या मोबाईलवर थेट घराचा नकाशा पाहता येईल. ही माहिती भविष्यात शेकडो वर्षांनंतरही उपलब्ध राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकार विशेष बाब म्हणून ही संपूर्ण प्रक्रिया पूर्णतः मोफत राबवणार असून त्यामुळे तहसीलदार कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज राहणार नाही. यावेळी आमदार शंकर जगताप यांनी २०१७ पासून भाजपच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला. आगामी काळातही शहराला विकासाच्या मार्गावर पुढे नेण्यासाठी भाजपचे 'विकासाचे व्हिजन' महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे येत्या १५ जानेवारी रोजी भाजपच्या उमेदवारांना मतांच्या रूपाने पाठिंबा देण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

### महिला बचत गटांना १ लाख रुपयांचे अनुदान

● नागपूरप्रमाणेच पिंपरी-चिंचवडमध्येही महिला बचत गटांसाठी अनुदान योजना राबवली जाणार असून निवडून आल्यानंतर प्रत्येक महिला बचत गटाला १ लाख रुपये अनुदान देण्यात येईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. तसेच 'लाडकी बहीण' योजना भाजप सरकार असेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# मॉडेल कॉलनीत चोरट्यांचा धुमाकूळ; दुकाने, रुग्णालय व उपाहारगृह फोडली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मॉडेल कॉलनीतील दीपबंगला चौक परिसरात चोरट्यांनी मध्यरात्री धुमाकूळ घालत सलग तीन ठिकाणी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. दुकानांचे दरवाजे उचकटून तसेच कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड व मोबाइल संच लांबविले. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपबंगला चौकात असलेल्या एका कपडे विक्रीच्या दुकानाचा दरवाजा ६ जानेवारी रोजी मध्यरात्री उचकटून चोरट्यांनी गल्ल्यातील सुमारे १० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याच परिसरातील एका खासगी रुग्णालयाचाही दरवाजा उचकटून तेथून मोबाइल संच लांबविण्यात आला. तसेच वेताळबाबा चौक परिसरातील एका उपाहारगृहाचे कुलूप तोडून चोरट्यांनी गल्ल्यातील रोकड व मोबाइल संच असा एकूण १५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी भेट दिली. परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यात येत असून, पोलीस हवालदार शिर्के पुढील तपास करत आहेत. दरम्यान, शहरातील चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### महिलेच्या पोटातून काढली तब्बल साडेतीन किलोची गाठ!

**पारगाव :** (ता. आंबेगाव) येथील ओम मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये एका महिलेच्या पोटातून तब्बल साडेतीन किलोची गाठ यशस्वीपणे काढण्यात आली. दोन तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेत सर्जन डॉ. नरेंद्र लोहकरे, डॉ. शिवाजी थिटे व त्यांच्या टीमने उल्लेखनीय कामगिरी केली. गेल्या सहा महिन्यांपासून पोटदुखीने त्रस्त असलेल्या महिलेवर अत्यल्प दरात उपचार केल्याने कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

### पेठमध्ये कृषी सेवा केंद्रावर दीड महिन्यात दोन वेळा चोरी

**मंचर :** पेठ (ता. आंबेगाव) येथील मारुती मंदिराजवळ असलेल्या किरण काळे यांच्या सह्याद्री कृषी सेवा केंद्रावर अवघ्या दीड महिन्यात दोन वेळा चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. १९ नोव्हेंबर रोजी ७० हजारांची रोकड, तर २ जानेवारी रोजी ३ लाख ११ हजारांची कृषी औषधे चोरट्यांनी लंपास केली. सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असूनही चोरटे मोकाट असल्याने व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### पाणी मुबलक, कांदा लागवड जोरात

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात मे महिन्यापासून झालेल्या जोरदार पावसामुळे विहिरी, नाले व ओढ्यांना मुबलक पाणी साठा झाला आहे. त्यामुळे लाखणगाव, लोणी, धामणी, जारकरवाडी, पोंदेवाडी, निरगुडसर परिसरात कांदा लागवड जोरात सुरू आहे. मात्र बदलत्या हवामानामुळे कांद्याची रोपे खराब झाल्याने रोपांचे भाव वाढले आहेत. मजुरांची टंचाई असल्याने शेतकरी सावड पद्धतीचा अवलंब करत असून, कांद्याच्या बाजारभावातील चढउतारामुळे उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत.

---

### उत्पादन चांगले, भाव मात्र अपेक्षेप्रमाणे नाहीत; योग्य हवामान व व्यवस्थापनामुळे उत्पादनात वाढ

# सातगाव पठार भागात बटाटा काढणी जोमात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार परिसरात सध्या बटाटा पिकाची काढणी जोरात सुरू असून शेतशिवारात लगबग पाहायला मिळत आहे. यंदा बटाट्याला अपेक्षित असा बाजारभाव मिळत नसला, तरी उत्पादन समाधानकारक निघाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये काहीसे समाधानाचे वातावरण आहे. योग्य हवामान, वेळेवर सिंचन आणि संतुलित खत व्यवस्थापन यामुळे यावर्षी बटाटा उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.





सातगाव पठारातील भावडी येथील शेतकरी विनायक चक्कर यांनी एका एकर क्षेत्रावर बटाट्याची लागवड केली होती. त्यांनी बटाटा बियाणे २५०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केले. बियाणे, लागवड, मजुरी, औषधे, रासायनिक खते तसेच कोंबड खत यांचा मिळून एकरी सुमारे ४५ ते ५० हजार रुपयांचा खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले. योग्य मशागत व व्यवस्थापन केल्यामुळे उत्पादन चांगले मिळाले असल्याचा अनुभव त्यांनी व्यक्त केला.

चक्कर यांच्या मते, एका ५० किलो वजनाच्या बटाटा बियाण्याच्या पिशवीतून सुमारे ९०० किलो उत्पादन मिळाले आहे. यंदा त्यांच्या शेतातून एकूण १८० बॅग बटाट्यांचे उत्पादन निघाले. सध्या बाजारात बटाट्याला प्रतिकिलो साधारण १५ रुपये असा दर मिळत असून विक्री थेट शेतातच (बांधावर) करण्यात आली आहे. खर्च वजा जाता एकरी सुमारे ९० हजार रुपयांपर्यंत नफा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

बाजारभाव जर २० ते २५ रुपये प्रति किलो दरम्यान मिळाला असता, तर एकरी दीड लाख रुपयांपर्यंत नफा मिळू शकला असता, असा अंदाजही शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. मात्र सध्याच्या बाजारस्थितीमुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याची खंतही अनेक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, मे ते ऑक्टोबर अखेरपर्यंत झालेल्या पावसामुळे यंदा बटाटा लागवड व काढणीचे वेळापत्रक काहीसे विस्कळीत झाले होते. त्यामुळे काढणी उशिरा व अनियमितपणे सुरू झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तरीदेखील अनुकूल हवामान व शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळे सातगाव पठार परिसरात बटाटा उत्पादन समाधानकारक झाले असून पुढील काळात बाजारभाव सुधारण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत

---

## हवामान बदलाचा ऊस पिकाला फटका; आंबेगाव तालुक्यात ऊसाला वेळेपूर्वी तुरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील उसाच्या पिकाला हवामान बदलाचा मोठा फटका बसला असून, तालुक्याच्या पूर्व भागात अनेक ठिकाणी ऊसाला वेळेपूर्वीच तुरे येऊ लागले आहेत. अचानक बदलणारे हवामान, उष्णता, थंडी, ढगाळ वातावरण आणि दाट धुके यांचा परिणाम उसाच्या वाढीवर झाला असून, यामुळे उसाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

साधारणपणे ऊस पिकाला तुरे येणे हे उत्पादनाच्या दृष्टीने घातक मानले जाते. तुरा आल्याने उसातील साखरेचे प्रमाण कमी होते, तसेच कांड्यांची वाढ खुंटते. परिणामी उसाच्या वजनावर परिणाम होऊन एकूण उत्पादन घटते. याचा थेट आर्थिक फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सांगितले की, यंदा लागवडीपासूनच हवामानाची साथ उसाच्या पिकाला मिळाली नाही. कधी अचानक तापमान वाढते, तर कधी कडाक्याची थंडी जाणवते. त्यातच ढगाळ हवामान व धुक्यामुळे ऊसाच्या नैसर्गिक वाढीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. या अस्थिर हवामानामुळे उसाला लवकर तुरे येण्याचे प्रमाण वाढल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

ऊस हे दीर्घकालीन पीक असल्याने त्यावर झालेला परिणाम तात्काळ भरून काढणे शक्य नसते. उत्पादनात घट झाल्यास साखर कारखान्यांना दिल्या जाणाऱ्या उसाच्या वजनावरही परिणाम होणार आहे. एकूणच हवामान बदलामुळे आंबेगाव तालुक्यातील ऊस शेती अडचणीत सापडली असून, यंदाच्या हंगामात ऊस उत्पादन घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

---

## लोणी मॅरेथॉन २०२६ उत्साहात संपन्न; देशभरातून ३५०० धावपटूंचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी :** (ता. आंबेगाव) येथे पुनीत बालन ग्रुप आणि माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोणी मॅरेथॉन २०२६ (चौथे वर्ष) मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. पुनीत बालन ग्रुप पुणे व ऑक्झरीच पुणे यांच्या प्रायोजकत्वाखाली झालेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून सुमारे ३५०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवत लोणीला क्रीडामय वातावरणात न्हाऊन काढले.

तीन किलोमीटर, पाच किलोमीटर, दहा किलोमीटर आणि २१ किलोमीटर (हाफ मॅरेथॉन) अशा चार अंतरांच्या शर्यती पुरुष व महिला गटांत घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धकाला टी-शर्ट, चेस्ट नंबर बिब देण्यात आला असून सर्व



पुनीत बालन ग्रुप व माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीच्या पुढाकारातून चौथ्या वर्षीही लोणी ठरले 'फिटनेस हब'

धावपटूंना पदक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण मार्गावर हायड्रेशन पॉइंट्स, डॉक्टरांसह अद्ययावत वैद्यकीय सुविधा तसेच रूट पायलट सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

या मॅरेथॉनमध्ये दिव्यांग स्पर्धकांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. तसेच दौंड व खंडाळा येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रांतील अनेक स्पर्धकांनीही धाव घेतली. अवर पोलीस अधीक्षक तथा 'आयर्न मॅन' म्हणून ओळखले जाणारे विष्णू ताम्हाणे, उपमुख्यमंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी डॉ. अमर भडांगे, क्रीडामंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी के. सुनील, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील तसेच दुबई व इटली येथे मॅरेथॉन पूर्ण केलेले आयर्न मॅन डॉ. सागर गुजराती हे प्रमुख अतिथी व सहभागी म्हणून उपस्थित होते.

---

## HSRP नंबर प्लेटवर आळेफाटा पोलिसांची कारवाई कुचकामी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** (ता. जुन्नर) परिसर हा संपूर्ण तालुका व जिल्ह्यात जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्रीसाठी 'माहेरघर' म्हणून ओळखला जातो. दुचाकी, चारचाकी तसेच व्यावसायिक वाहनांचे मोठ्या प्रमाणावर व्यवहार येथे होत असल्याने दूर-दूरच्या भागातून नागरिक आळेफाट्यात येतात. मात्र हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (HSRP) संदर्भातील अंतिम मुदत संपूनही या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने आळेफाटा पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

राज्य परिवहन विभागाच्या निर्देशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर HSRP नंबर प्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. सुरुवातीला ३१ मार्च २०२५ ही अंतिम मुदत देण्यात आली होती. ऑनलाईन नोंदणीतील अडचणी, प्लेट मिळण्यास होणारा विलंब आणि नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन प्रशासनाने टप्प्याटप्प्याने मुदत वाढ दिली.

३० एप्रिल, ३० जून, १५ ऑगस्ट आणि ३० नोव्हेंबर २०२५ नंतर अखेर ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम व शेवटची मुदत जाहीर करण्यात आली. या तारखेनंतर HSRP नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आदेश देण्यात आले होते. मात्र २०२६ सुरू होऊनही आळेफाटा परिसरात या नियमांचे उल्लंघन सर्रास सुरू असल्याचे चित्र आहे. महामार्ग, बाजारपेठ तसेच ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर जुने नंबर प्लेट असलेली वाहने धावताना दिसत आहेत.

तरीदेखील आळेफाटा पोलिस व वाहतूक शाखेकडून ठोस तपासणी मोहीम, दंडात्मक कारवाई किंवा वाहन जप्ती होत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम व नाराजी आहे.

---

## जारकरवाडीतील साकव पूल ठरतोय 'असून अडचण, नसून खोळंबा'; ग्रामस्थांचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील खुडेवस्ती परिसरात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेला साकव पूल अद्याप वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही. परिणामी, या पुलाची अवस्था सध्या 'असून अडचण, नसून खोळंबा' अशीच झाली असून वाहनचालक व स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

सदर साकव पूल जारकरवाडी–पारगाव रस्त्याला जोडणारा महत्त्वाचा दुवा असून या मार्गावरून दररोज शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच प्रवाशांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. याशिवाय भीमाशंकर सहकारी साखर कारखाना सुरू झाल्याने जारकरवाडी, ढोबळेवाडी परिसरातील ऊस वाहतूकही याच रस्त्यावरून सुरू आहे. अशा परिस्थितीत पूल बंद असल्याने वाहतूक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे.



लाखो रुपये खर्चून उभारलेला पूल वाहतुकीसाठी अद्याप बंद; अपघाताचा धोका वाढला

स्थानिक नागरिकांच्या बांधकाम विभागाच्या संबंधित ठेकेदाराने पुलाचे काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेली माहितीची पाटीही लावलेली नाही. त्यामुळे कामाचा कालावधी, खर्च आणि ठेकेदाराची माहिती अद्याप अस्पष्ट आहे. ठेकेदाराच्या या निष्काळजीपणाकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत की काय, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

सध्या पुलावर झाडांचे खोड, सिमेंटचे पाईप आणि दगड अस्ताव्यस्त पडलेले दिसून येत आहेत. तसेच पुलाच्या कठड्याचे कामही अपूर्ण अवस्थेत आहे. शक्यता असून, एखादी दुर्दैवी घटना घडण्याची वाट पाहिली जात असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने नेमलेल्या ठेकेदाराने या पुलाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. पूल तयार असूनही तो वाहतुकीसाठी सुरू न केल्याने परिसरातील नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे.

अपघात घडण्यापूर्वीच संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून अपूर्ण काम पूर्ण करावे आणि साकव पूल लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला करावा, अशी जोरदार मागणी जारकरवाडी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

## अंगारक चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथे भाविकांची अलोट गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** नवीन वर्षातील पहिल्या अंगारक चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील प्रसिद्ध श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात मंगळवारी पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम, आरत्या आणि भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

या वर्षातील पहिलीच अंगारक चतुर्थी असल्याने राज्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी दाखल झाले होते. पहाटे देवस्थानात महापूजा पार पडली. त्यानंतर २१ जोडप्यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक करण्यात आला. पहाटेपासूनच भाविकांची दर्शनासाठी ये-जा सुरू झाली होती. सकाळी सात वाजता आरती झाल्यानंतर अधिकृतपणे दर्शन रांग सुरू करण्यात आली.

"गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषात भाविक मोठ्या श्रद्धेने श्रींचे दर्शन घेत होते. दिवसभर दर्शन रांगा कायम होत्या. सायंकाळनंतर

+ जे. जे. इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

तर दर्शन रांग पायथ्यापर्यंत जाऊन पोहोचली होती. रात्री उशिरापर्यंत भाविक शांतपणे रांगेत उभे राहून दर्शन घेत होते.

भाविकांच्या वाढत्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने सुरक्षा रक्षक नेमण्यात आले होते. याशिवाय पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दुपारी तीन वाजता आरती, तर सायंकाळी सात वाजता मुख्य आरती मोठ्या भक्तिभावात पार पडली. चंद्रोदयानंतर श्रींना नैवेद्य दाखवण्यात आला. रात्री गुरुदत्त प्रासादिक भजनी मंडळाचे भजन कार्यक्रम झाले. अंगारक चतुर्थीनिमित्त पेशवेकालीन अर्धपीठ गणपती मंदिरावर फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. संपूर्ण मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. लाकडी बॅरिकेट लावून दर्शन रांगा करण्यात आल्याने भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन घेता आले. उन्हापासून आणि थकव्यापासून बचावासाठी सावलीचे मंडप उभारण्यात आले होते.

---

## बालचमूंनी भरवला 'भाजी बाजार' आणि 'खाऊ गल्ली'

### रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्या व्यापाऱ्यांचा आत्मविश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पौड :** ओतूर येथील रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी 'भाजी बाजार' आणि 'खाऊ गल्ली' या अभिनव शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने शाळेचे प्रांगण जणू लघु बाजारपेठेत रूपांतरित झाले होते. अवघ्या दोन तासांत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सर्व भाजीपाला व खाद्यपदार्थांची विक्री करून आपल्यातील सुप्त 'व्यापारी' गुण दाखवून दिले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मेथी, कोथिंबीर, पालक यांसारख्या ताज्या भाज्यांचे स्टॉल उभारले होते. तसेच विविध चटपटीत खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स लावण्यात आले होते. "काका, ताजी भाजी घ्या!", "मावशी, आमचा खाऊ खाऊन बघा!" अशा निरागस हाकांनी संपूर्ण परिसर गजबजून गेला होता.



मुलांच्या चेहऱ्यावर जबाबदारीचे हास्य आणि डोळ्यांत आत्मविश्वास झळकत होता.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहारिक गणित, पैशांचे व्यवहार, ग्राहकांशी संवाद, श्रमप्रतिष्ठा आणि टीमवर्क यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून शिकता आले. मोबाईल व टीव्हीच्या दुनियेत अडकलेल्या मुलांना प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराशी जोडण्याचे हे एक प्रभावी माध्यम ठरले. स्टॉल मांडणीपासून ते विक्रीपर्यंत सर्व कामे मुलांनी एकत्रितपणे करत संघभावनेचे दर्शन घडवले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभारी मुख्याध्यापिका प्रिया भोर, कायमस्वरूपी मुख्याध्यापिका सुजाता कासार, शाळा समन्वयक परिघा कदम तसेच अध्यापिका प्रिया भोर, स्वप्नाली औटी, हिना इनामदार, अश्विनी शिंगोटे, राणी सातपुते, शमा तांबोळी, आरती देशमुख, सोनिया शिंगोटे, नम्रता कुलकर्णी, शितल नलावडे, प्रांजली शेटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्थेचे विश्वस्त डॉ. वल्हवणकर, जगताप, वसंतराव तांबे सर व रामदास तांबे यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

---

## पत्रकारांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी – शरद पाबळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** पत्रकारांनी आपल्या व्यस्त व धगधगत्या आयुष्यात आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे यांनी केले. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणारा ताण-तणाव पत्रकारांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम करत असल्याने वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार दिनानिमित्त शिरूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने शिरूर येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पाबळे बोलत होते.

या कार्यक्रमास मातोश्री मदनबाई धारिवाल हॉस्पिटल व रुबी हॉल क्लिनिक शिरूरचे डॉ. मायकल पॉल, डॉ. संजीव तांदळे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष संजय बारहाते, मदन काळे, प्रा. सतीश धुमाळ, प्रविण गायकवाड, दीपाली काळे, मुकुंद ढोबळे, पोपटराव पाचंगे, अभिजित आंबेकर, धर्मा मैड, अनिल सोनवणे, सुदर्शन दरेकर आदी उपस्थित होते. शरद पाबळे यांनी पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्याची सूचना रुबी हॉल क्लिनिकला केली.

---

### उपविजेता चषकावर नाव कोरले; ३ सुवर्ण व १ रौप्य पदकांची कमाई

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पाबळच्या मतिमंद मुलांची घवघवीत कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे येथील कै. बाबुराव सणस क्रीडांगण, सारसबाग येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग शालेय क्रीडा स्पर्धेत भ. वि. जा. शिक्षण संस्था, मुंढवा (पुणे) संचलित मतिमंद मुलांची निवासी शाळा, पाबळ येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कामगिरी करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेता चषकासह ३ सुवर्ण व





१ रौप्य पदकांची घवघवीत कमाई केली. या स्पर्धेत चिन्मय भोसले याने आपली खेळातील गुणवत्ता सिद्ध करत ५० मीटर धावणे या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. याचबरोबर जागेवरून लांब उडी या क्रीडा प्रकारातही त्याने प्रथम क्रमांक मिळवत दुहेरी सुवर्णपदकाची कमाई केली. चिन्मयच्या या दमदार कामगिरीमुळे शाळेच्या यशात मोलाची भर पडली.

तसेच सुरेश घुले याने १०० मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. याशिवाय पळत येऊन लांब उडी या प्रकारात त्याने द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदक मिळवले. या दोन्ही खेळाडूंनी दाखवलेल्या आत्मविश्वासपूर्ण खेळामुळे उपस्थित प्रेक्षकांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.

या एकूण कामगिरीच्या जोरावर पाबळ येथील मतिमंद मुलांच्या निवासी शाळेने जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेता चषक पटकावला. यासोबतच सन २०२५–२६ साठी मतिमंद प्रवर्ग (सर्वसाधारण) उपविजेतेपदही शाळेने मिळवले असून ही बाब शाळेसाठी अभिमानास्पद ठरली आहे. या यशस्वी खेळाडूंना जिल्हा परिषद पुणेचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मा. राधाकिसन देवढे यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उल्लेखनीय यशामागे क्रीडा शिक्षक विजय सदाशिव, डॉ. किरण बोडके, विषय शिक्षक हराळ दत्तात्रेय, परिचारिका मनीषा सुभाष जाधव तसेच प्रफुल्ल गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक सिद्धेश्वर बाबुराव पाटील आणि व्यवस्थापक गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

या यशामुळे पाबळ परिसरात शाळेचे सर्वत्र कौतुक होत असून विद्यार्थ्यांवर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सारांश वृत्त



### बर्फवृष्टीने पर्यटकांना दिला आनंद

**भदरवाह/जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या दोडा जिल्ह्यातील भदरवाहच्या उंच भागात झालेल्या ताज्या बर्फवृष्टीमुळे पर्यटकांना आनंद झाला, जे पावसाच्या अपेक्षेने या नयनरम्य दरीत गर्दी करून आले होते आणि त्यांच्या बहुप्रतिक्षित इच्छा प्रत्यक्षात आल्या. देशाच्या विविध भागांमधून, विशेषतः महाराष्ट्रातून आलेल्या पर्यटकांनी सांगितले की त्यांनी पहिल्यांदाच बर्फवृष्टी पाहिली आणि ते एक सुखद आश्चर्य असल्याचे म्हटले. बर्फाच्छादित अल्पाइन लँडस्केपचा आनंद घेण्यासाठी गुलदंडा, पंज नाला आणि चत्तरगल्ला येथे पर्यटक मोठ्या संख्येने जमले होते.

### वांगचुक याचिकेवर आज सुनावणी

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी तुरुंगात असलेल्या हवामान कार्यकर्त्या सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे अंगमो यांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत त्यांच्या अटकेविरुद्ध दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी ८ जानेवारीपर्यंत तहकूब केली. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने हे प्रकरण पुढे ढकलले. सोनमची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या सूचनेला सहमती दर्शवली.

### मुलीचे अपहरण करून हत्या

**बेंगळुरू :** पूर्व बेंगळुरूमधील व्हाईटफील्डजवळ एका सहा वर्षांच्या मुलीचे अपहरण करून हत्या करण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला पश्चिम बंगालमधील एका स्थलांतरित कामगाराची मुलगी आहे. मुलीच्या वडिलांनी ६ जानेवारी रोजी तक्रार दाखल केली की त्यांची मुलगी ५ जानेवारी दुपारी बेपत्ता झाली आहे आणि त्यांना जवळच राहणाऱ्या पश्चिम बंगालमधील एका स्थलांतरित कामगाराच्या भूमिकेचा संशय आहे.

## पाच जणांना अटक, दगडफेकीत ५ पोलिस जखमी

# दिल्लीतील मशिदीजवळ हिंसाचार...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्लीतील रामलीला मैदान परिसरातील सय्यद फैज इलाही मशिदीजवळ अतिक्रमणविरोधी मोहीमे दरम्यान बुधवारी हिंसाचार झाला. दिल्ली पोलिसांनी याप्रकरणी एफआयआर नोंदवली असून, पाच जणांना ताब्यात घेतले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) अधिकारी मशिदीला लागून असलेल्या जमिनीवर आणि तुर्कमान गेट परिसरातील जवळच्या कब्रस्तानवर न्यायालयाच्या आदेशानुसार तोडफोड करत होते, तेव्हा काही लोकांनी पोलिसांवर दगडफेक आणि काचेच्या बाटल्या फेकल्या. यामुळे किमान पाच पोलिस कर्मचाऱ्यांना किरकोळ जखम झाली.



एमसीडी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मोहिमेदरम्यान *मशिदीचे कोणतेही नुकसान झाले नाही आणि मोहिमेचा उद्देश फक्त अतिक्रमण हटवणे हा होता. पोलिसांच्या प्राथमिक अहवालानुसार सुमारे २० ते २५ जणांनी पोलिसांवर दगडफेक केली. सोशल मीडियावर फिरणाऱ्या सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ क्लिप्सचे विश्लेषण करून पोलिस गुन्हेगारांची ओळख पटवण्याचे प्रयत्न करत आहेत. तपासात साक्षीदारांचे आणि ताब्यात घेतलेल्या व्यक्तींचे जबाबही नोंदवले जात आहेत.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. वरिष्ठ पोलिसांनी सांगितले की, यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि परिसरात कायदा आणि सुव्यवस्था कायम राहिली. पोलिसांनी बीएनएस कलम २२१/१३२/१२१/१९१(२)/१९१(३), २२३ (अ)/३(५) आणि पीडीपीपी कायदा-१९८४ अंतर्गत एफआयआर नोंदवली आहे.

पोलीस उपायुक्त (मध्य) निधीन वलसन यांनी सांगितले की, एमसीडीने ६ आणि ७ जानेवारीच्या मध्यरात्री इमारत पाडण्याचे नियोजन केले होते आणि पोलिस कर्मचाऱ्यांना घटनास्थळी तैनात करण्यात आले. या मोहिमेत ३० बुलडोझर, ५० डंपर आणि ३०० हून अधिक एमसीडी कामगार व अधिकारी सहभागी झाले. पाडावामुळे न्यायालयाने बेकायदेशीर घोषित केलेल्या बांधकामांचा समावेश असलेले मोठे अतिक्रमित क्षेत्र मोकळे झाले.

जमावात सुरुवातीला सुमारे १००-१५० लोक उपस्थित होते. बहुतेक लोकांना पटवून दिल्यानंतर ते पांगले, परंतु काहींनी दगडफेक करून गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पाच पोलिस किरकोळ जखमी झाले आणि त्यांना वैद्यकीय उपचार देण्यात आले. डीसीपी म्हणाले, जमाव पांगवण्यासाठी आम्हाला अश्रूधुराचा वापर करावा लागला, त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि सामान्य स्थिती पूर्ववत झाली, असे त्यांनी स्पष्ट केले.

## लडाखमध्ये स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द झाल्यानंतर ५ ऑगस्ट २०१९ रोजी लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला. त्या वेळी मोदी सरकारच्या निर्णयाचे स्थानिक लोकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले होते. परंतु आता लडाखमध्ये पुन्हा असंतोष वाढत असल्याचे दिसून येत आहे. लोक आता स्वतंत्र राज्याचा दर्जा आणि सहावा अनुसूचीत समावेश ही मागणी करत आहेत.

तीन महिन्यांपूर्वी याच मागणीसाठी लडाखमध्ये मोठे आंदोलन झाले होते. त्या वेळी पोलिसांच्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला होता. आता लडाखमधील प्रमुख संघटना पुन्हा सक्रिय झाल्या आहेत आणि त्यांनी आपले आंदोलन थेट राजधानी दिल्लीत नेण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे लडाखच्या मुद्द्यावर पुन्हा वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

लडाखमधील ॲपेक्स बॉडी लेह आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स या दोन प्रमुख संघटनांनी केंद्र सरकारकडे स्पष्ट इशारा दिला आहे. संघटनांचा आरोप आहे की केंद्र सरकार लडाखच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीनंतर गृह मंत्रालयाने लडाखमधील जनतेशी संबंधित प्रश्नांवर कोणतीही नवीन बैठक घेतली नाही.

संघटनांचे स्पष्ट मत असे आहे की, केंद्र सरकारने तातडीने लडाखला स्वतंत्र राज्याचा दर्जा द्यावा, लडाखचा सहावा अनुसूचीत समावेश करावा, स्थानिक लोकांचे हक्क सुरक्षित करावेत. अन्यथा, त्यांच्याकडे दिल्लीमध्ये शांततेत आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असे दोन्ही संघटनांनी स्पष्ट केले आहे. सज्जाद कारगिली, कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्सचे नेते, यांनी रविवारी आंदोलनाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, सप्टेंबरमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर २२ ऑक्टोबर रोजी गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली होती आणि नोव्हेंबरमध्ये त्यांनी प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला होता. तथापि, केंद्राकडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही.

## व्हेनेझुएलाचे तेल अमेरिकेच्या ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाचे अंतरिम अध्यक्ष ३० ते ५० दशलक्ष बॅरल तेल अमेरिकेला सुपूर्द करतील,अशी घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की हे तेल बाजारभावाने विकले जाईल आणि अमेरिका स्वत: यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर नियंत्रण ठेवेल. या ५० दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाची सध्याची बाजारभावाने किंमत अंदाजे २५ हजार कोटी रुपये आहे.

अमेरिकन अध्यक्षांच्या मते, ही रक्कम व्हेनेझुएला आणि अमेरिकेच्या लोकांच्या हितासाठी वापरली जाईल. हे तेल साठवणूक जहाजांद्वारे थेट अमेरिकन बंदरांवर पोहोचवले जाईल. २ जानेवारी रोजी अमेरिकेने व्हेनेझुएलावर लष्करी कारवाई सुरू केली. या कारवाईत अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अटक करून अमेरिकेत आणण्यात आले. त्यानंतर ट्रम्प यांनी उपराष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांच्या अंतरिम अध्यक्षपदी नियुक्तीला पाठिंबा दिला.

मादुरो यांच्या अटकेनंतर, ट्रम्प यांनी घोषणा केली की अमेरिकी तेल कंपन्या व्हेनेझुएलाच्या तेल पायाभूत सुविधा दुरुस्त करण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करतील. यामुळे व्हेनेझुएलाला तेल उत्पादनातून पुन्हा उत्पन्न मिळवण्यास मदत होईल. फ्लोरिडा येथे पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिका आता तेल व्यवसायात आहे आणि इतर देशांनाही तेल पुरवेल. व्हेनेझुएला कमकुवत पायाभूत सुविधांमुळे जास्त तेल काढू शकत नाही. यापूर्वी, ट्रम्प यांनी सांगितले होते की त्यांना व्हेनेझुएलात पूर्ण प्रवेश हवा आहे. ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाला मरणासन्न देश म्हणून संबोधले असून, त्याला पुनरुज्जीवित करण्याची आवश्यकता आहे. व्हेनेझुएलाला पुनरुज्जीवित करण्यासाठी आम्हाला देशाच्या तेल आणि इतर संसाधनांवर पूर्ण प्रवेश हवा आहे.

## अमेरिकेची नजर आता ग्रीनलँडवर; डेन्मार्कचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** वर्षाच्या सुरुवातीला अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी व्हेनेझुएलावर केलेल्या आक्रमणानंतर, आता अमेरिकेची नजर ग्रीनलँडकडे वळली आहे. ट्रम्प यांनी वारंवार सांगितले आहे की ग्रीनलँड अमेरिकेसाठी खूप महत्त्वाचा आहे आणि कोणत्याही किंमतीत तो घेतलाच पाहिजे. अमेरिकेने स्पष्ट केले की राष्ट्रीय सुरक्षेसाठी ग्रीनलँडवर नियंत्रण मिळवणे ट्रम्प प्रशासनाचे प्राधान्य आहे आणि त्यासाठी गरज पडल्यास लष्करी पर्यायही वापरले जातील.

या पार्श्वभूमीवर डेन्मार्कने अमेरिकेला इशारा दिला आहे की, ग्रीनलँडवर कब्जा केल्यास नाटोचे अस्तित्वच धोक्यात येईल. पाश्चात्य देशांनी संयुक्त निवेदन जारी करत ग्रीनलँडवरील कोणताही निर्णय फक्त डेन्मार्क आणि ग्रीनलँडच्या अधिकारात असल्याचे सांगितले. या निवेदनात फ्रान्स, जर्मनी, इटली, पोलंड, स्पेन आणि ब्रिटनचे पंतप्रधान सहभागी आहेत. ग्रीनलँडची लोकसंख्या सुमारे ५७,००० आहे. १९५३ मध्ये ग्रीनलँड डॅनिश संविधानाचा भाग बनले, तर २००९ मध्ये त्याला स्वराज्याचा अधिकार मिळाला. गेल्या वर्षीच्या निवडणुकीत व्यवसाय समर्थक डेमोक्रॅटिक पक्ष अमेरिकेच्या हस्तक्षेपाविरुद्ध एकतेचे प्रदर्शन करत आहे आणि हळूहळू स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करतो.

आर्थिकदृष्ट्या, ग्रीनलँड मासेमारीवर अवलंबून आहे आणि निर्यातीतील ९५ टक्के उत्पादन यावर आधारित आहे. या प्रदेशात दुर्मिळ खनिज, तेल आणि नैसर्गिक वायूचे मोठे साठे आहेत, परंतु बहुतेक खाण कंपन्या ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि यूकेच्या मालकीच्या आहेत. ग्रीनलँडमधील खनिजे विशेषतः मोबाईल, संगणक, बॅटरी आणि उच्च-तंत्रज्ञान उपकरणांसाठी महत्त्वाची आहेत, ज्या सध्या चीनच्या ताब्यात आहेत. ग्रीनलँडची सामरिक स्थिती देखील महत्त्वाची आहे. बहुतेक इनुइट समुदाय येथे राहतात आणि प्रदेशाचा जवळजवळ ८० टक्के भाग आर्क्टिक सर्कलच्या वर आहे. दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेने ग्रीनलँडवर ताबा मिळवला होता, जेणेकरून नाझी जर्मनीपासून संरक्षण करता आले. रशिया, चीन आणि इतर देशांमध्ये या प्रदेशात प्रवेश आणि खनिज संसाधनांवर नियंत्रणासाठी स्पर्धा तीव्र झाली आहे. अमेरिकेसाठी ग्रीनलँड हे सामरिक दृष्ट्याही महत्त्वाचे ठरत आहे. ट्रम्प प्रशासनाच्या या प्रयत्नामुळे जागतिक पातळीवर तणाव वाढण्याची शक्यता असून, युरोप आणि पाश्चात्य राष्ट्रांनी अमेरिकेला स्पष्ट इशारे दिले आहेत.

## सत्ताधारी द्रमुकच्या अडचणींमध्ये वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीपूर्वी, पट्टाली मक्कल कच्ची (पीएमके) ने बुधवारी एआयएडीएमके-भाजप युतीत सामील होण्याचा निर्णय जाहीर केला. चेन्नईतील ग्रीनवेज रोडवरील ईपीएसच्या निवासस्थानी एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडाप्पाडी के. पलानीस्वामी आणि पीएमकेचे अध्यक्ष डॉ. अंबुमणी रामदास यांनी भेट घेतल्यानंतर ही घोषणा केली.

युतीच्या स्थापनेबाबत बंद दाराआड झालेल्या चर्चेनंतर, दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद आयोजित केली. या प्रसंगी, पलानीस्वामी म्हणाले की, ही युती अण्णा द्रमुक आणि पीएमकेच्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या आणि समर्थकांच्या इच्छेनुसार स्थापन करण्यात आली आहे. ही विजयी युती आहे. आमचे सामूहिक ध्येय म्हणजे जनविरोधी द्रमुक सरकारला पराभूत करणे आणि तामिळनाडूच्या लोकांसाठी कल्याणकारी शासन स्थापन करणे, असे ते म्हणाले. ईपीएसने असेही सांगितले की एआयएडीएमकेच्या नेतृत्वाखालील युती २३४ विधानसभा मतदारसंघांपैकी बहुतेक ठिकाणी विजय मिळवेल आणि स्पष्ट जनादेशासह पुन्हा सत्तेत येईल."एआयएडीएमके, भाजप आणि पीएमके मोठ्या प्रमाणात निवडणूक विजय मिळविण्यासाठी अथक परिश्रम करतील, असे त्यांनी नमूद केले. जागावाटपाच्या अंतिम तपशीलांची घोषणा नंतर केली जाईल.

पीएमकेचे अध्यक्ष डॉ. अंबुमणी रामदास यांनी हा आनंदी क्षण असल्याचे म्हटले. द्रमुकविरुद्ध व्यापक संताप असून, जनता निवडणुकीची आतुरतेने वाट पाहत आहेत.राज्यातील विशेषतः सुमारे १०० विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रभावशाली असणारा पीएमके, अण्णा द्रमुक-भाजप युतीत सामील झाल्यामुळे, निवडणुकीपूर्वी विरोधी आघाडीला मोठा निवडणूक फायदा मिळाला आहे, असे मानले जाते.

## भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश

# सार्वजनिक सुरक्षा ही सर्वोच्चच...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना भावनिक मुद्द्यांपेक्षा सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य दिले. न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने स्पष्ट सांगितले की रस्ते, शाळा आणि सरकारी संस्था कुत्र्यांपासून मुक्त ठेवणे आवश्यक आहे. सुनावणी दरम्यान वकिलांनी कुत्र्यांच्या हक्कांचा मुद्दा मांडला असता खंडपीठाने म्हटले, कुत्रा कधी चावण्याच्या मनःस्थितीत आहे हे ठरवता येत नाही. उपचारापेक्षा प्रतिबंध जास्त प्रभावी आहे.





खंडपीठाने असेही म्हटले की प्रत्येक कुत्रा चावत नाही हा युक्तिवाद ग्राह्य धरला जात नाही. रस्त्यांवर अचानक कुत्र्यांचे येणे अपघातांना कारणीभूत ठरते, त्यामुळे वाहनचालकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणे कुत्र्यांपासून मुक्त ठेवणे गरजेचे आहे. शाळा, रुग्णालये व इतर सार्वजनिक संस्था यामध्ये कुत्रे नसावेत, असेही निर्देश दिले. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी निवासी संघटनांना अधिकार देण्याची बाजू मांडली. त्यांनी विनोदी पण स्पष्ट शब्दांत सांगितले, आपण सर्व प्राणीप्रेमी आहोत, पण मानवांवर प्रेम करणेही तितकेच आवश्यक आहे. कोणी समाजात ताजे दूध मिळावे म्हणून म्हैस आणली, तर ती इतरांना त्रास देईल, तसेच कुत्र्यांच्या बाबतीतही आहे.

न्यायालयाने आपल्या पूर्वीच्या आदेशाची ताकद वाढवून म्हटले की, दिल्ली आणि एनसीआरमध्ये रेबीजच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्यामुळे निवासी भागातून भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात पाठवणे बंधनकारक आहे. रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना अन्न देण्याची परवानगी नाही.

महानगरपालिकांनी यासाठी समर्पित ठिकाणांची व्यवस्था करावी आणि कुत्रे पकडण्यापासून अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सांगितले.

खंडपीठाने प्रशासकीय सुस्ती हे अपयश मानले असून, महानगरपालिकांनी नियमितपणे सार्वजनिक ठिकाणांची तपासणी करावी आणि कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत आक्रमक किंवा रेबीजचा संशय असलेल्या कुत्र्यांना सोडले जाणार नाही, असा आदेश दिला. या निर्णयामुळे सार्वजनिक सुरक्षा आणि जनतेच्या आरोग्याचे रक्षण करताना भटक्या कुत्र्यांशी निगडित धोके कमी करण्याकडे सर्वोच्च न्यायालयाने ठोस भूमिका घेतली आहे.

## कायद्याला बगल देण्याची प्रवृत्ती धोकादायक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मनी लाँडरिंगशी संबंधित एका महत्त्वाच्या प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे निरीक्षण केले आहे की आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक खटला सुरू झाल्यानंतरही कायद्याला आव्हान देण्यासाठी न्यायालयाचा वापर करतात. भारताचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी या प्रवृत्तीबद्दल चिंता व्यक्त केली, कारण याचा न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरही परिणाम होतो.

सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश एच.एल. कांत आणि न्यायमूर्ती जोयमाला यांच्या खंडपीठासमोर ऑगस्टा वेस्टलँड व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टर व्यवहार प्रकरणातील याचिका सुनावणीसाठी दाखल करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपी दिल्लीतील वकील गौतम खेतान यांनी या याचिका दाखल केली. त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांनी पीएमएलएच्या काही तरतुदींच्या वैधतेवर विधिक मुद्दे मांडले. सुनावणीदरम्यान मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी गंभीर स्वरात म्हटले, खटला सुरू असताना श्रीमंत आणि प्रभावशाली लोक न्यायालयात येऊन कायद्याला आव्हान देतात, ही प्रवृत्ती चिंताजनक आहे. कोणताही नागरिक खटल्याचा सामना करतो, त्यात श्रीमंत आणि सामान्य नागरिक यात फरक नाही. न्यायालयात अशी दृष्टीकोन स्वीकारणे योग्य नाही. न्यायालयाने असेही म्हटले की, पूर्वी पीएमएलएच्या तरतुदींविरुद्ध दाखल केलेले आव्हान अजून प्रलंबित आहे, त्यामुळे सध्याची याचिका विचारात घेणे शक्य नाही.

विशेष म्हणजे, हे प्रकरण काही काळापूर्वीच्या घटनांशीही संबंधित आहे. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये पीएमएलएच्या कलम ४४ अंतर्गत अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) तरतुदींना आव्हान दिले होते. आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांकडून न्यायालयाचा उपयोग करून कायद्याचे पालन टाळण्याची प्रवृत्ती काही काळापासून दिसत आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेवर ताण आणते आणि सामान्य नागरिकांच्या न्यायप्रक्रियेवर परिणाम करते. न्यायालयाने या प्रकारच्या याचिकांवर काटेकोर मार्गदर्शन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

## पश्चिम बंगालमध्ये थंडी वाढणार

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील तीन-पाच दिवस थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे, कमाल आणि किमान तापमान सामान्य श्रेणीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे, असे आयएमडीने बुधवारी सांगितले. या काळात सकाळी आणि दुपारी उथळ ते मध्यम धुके पडण्याची शक्यता आहे. दार्जिलिंगमध्ये बुधवारी सर्वात कमी किमान तापमान ३.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, तर बीरभूम जिल्ह्यातील श्रीनिकेतन हे मैदानी भागातील सर्वात थंड ठिकाण होते जे ६.२ अंश सेल्सिअस होते.

## व्हेनेझुएलाजवळ रशियाच्या पाणबुडी तैनातीने तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** रशियाने व्हेनेझुएलाच्या जवळील एका टँकरला अमेरिकेच्या संभाव्य जप्तीपासून वाचवण्यासाठी पाणबुडी तैनात केली आहे. रशिया अनेक दशकांपासून व्हेनेझुएलाचा समर्थक आहे आणि रशियन पाणबुडी तैनात केल्याने या प्रदेशातील तणाव आणखी वाढू शकतो.

रशियाने उत्तर अटलांटिकमध्ये एका अडकलेल्या तेल टँकरला सुरक्षित ठेवण्यासाठी एक पाणबुडी आणि इतर नौदल उपकरणे तैनात केली आहेत. पूर्वी बेला १ म्हणून ओळखले जाणारे टँकर गेल्या दोन आठवड्यांहून अधिक काळ व्हेनेझुएलाच्या बाहेर बंदी घातलेल्या तेलवाहतुकीला लक्ष्य करणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाकाबंदीतून बचावण्याचा प्रयत्न करत आहे. वृत्तानुसार, अटलांटिकमध्ये जाण्यापूर्वी जहाज कच्चे तेल आणण्यात आणि लोड करण्यात अयशस्वी ठरले. तेल नसतानाही, अमेरिकन तटरक्षक दलाने या टँकरचा पाठलाग केला. जहाजावरील कर्मचाऱ्यांनी जहाजाच्या बाहेरील बाजूस एक रशियन ध्वज रंगवला, जहाजाचे नाव बदलून मरीनेरा ठेवले आणि ते रशियामध्ये नोंदणीकृत केले. या हालचालींमुळे कोणत्याही संभाव्य जप्तीभोवती कायदेशीर वातावरण खूपच गुंतागुंतीचे झाले आहे. आता पाणबुडी तैनात केल्याने या तणावात भर पडली आहे.

## पंतप्रधान मोदी यांनी विनंती केल्याचे खोटेच सांगितले...

# ट्रम्पचा अपाचे हेलिकॉप्टर दावा तथ्यांशी विसंगत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताबद्दल चुकीचा दावा केला आहे. भारताने अमेरिकेकडून ६८ अपाचे हल्ला करणारे हेलिकॉप्टर मागवले होते, परंतु वितरणात विलंब झाल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना वैयक्तिक भेट घेण्याची परवानगी मागावी लागली, असे त्यांनी म्हटले. ट्रम्प यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदी माझ्याकडे आले आणि विचारले, सर, मी तुम्हाला भेटू शकतो का? आणि मी हो म्हटले, असे त्यांनी म्हटले आहे.

ट्रम्प यांचा हा दावा खोटा आहे. अधिकृत रेकॉर्ड, वितरणाची



माहिती आणि लष्करी सूत्रांशी झालेल्या चर्चांनुसार भारताने अमेरिकेकडून आतापर्यंत फक्त २८ अपाचे हेलिकॉप्टर खरेदी केले असून, ते सर्व डिसेंबर २०२५ पर्यंत भारतात पोहोचले आहेत. भारताने दोन टप्प्यांत ही खरेदी केली. पहिला करार सप्टेंबर २०१५ मध्ये ओबामा प्रशासनाच्या शेवटच्या काळात झाला, ज्यामध्ये भारतीय हवाई दलासाठी २२ हेलिकॉप्टर खरेदी करण्यात आले. या कराराची किंमत अंदाजे २.२ अब्ज डॉलर होती. सर्व हेलिकॉप्टर वेळेत वितरित करून हवाई दलाच्या दोन फॉरवर्ड स्क्वॉड्रनमध्ये समाविष्ट केले गेले.

दुसरा करार फेब्रुवारी २०२० मध्ये ट्रम्प यांच्या भारत भेटीदरम्यान झाला, ज्यामध्ये भारतीय लष्करासाठी सहा अपाचे हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा समावेश होता. या ऑर्डरची किंमत अंदाजे ६०० ते ८०० दशलक्ष डॉलर दरम्यान होती, परंतु वितरणात विलंब झाला. कोविड-१९ नंतर अमेरिकेतील ॲरिझोना येथील बोईंग उत्पादन केंद्राला पुरवठा साखळीतील अडचणी, तांत्रिक अडथळे आणि वीज-संबंधित अडचणींमुळे डिलिव्हरी उशीर झाला. त्यात नोव्हेंबर २०२५ मध्ये तुर्कीने अपाचे हेलिकॉप्टर वाहून नेणाऱ्या अँटोनोव्ह-१२४ विमानांना हवाई क्षेत्रातून जाण्यास परवानगी नाकारल्यामुळे अंतिम बॅच आणखी विलंबित झाली. शेवटी, ही तीन हेलिकॉप्टर डिसेंबर २०२५ मध्ये भारतात पोहोचली. हे दोन्ही करार एकत्रित केल्यास भारताने एकूण २८ हेलिकॉप्टर खरेदी केले आहेत, जे ट्रम्प यांच्या नमूद केलेल्या ६८ पेक्षा निम्म्यापेक्षा कमी आहे. भारत हळूहळू अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करत आहे. मेक इन इंडिया धोरणांतर्गत प्रचंड हे स्वदेशी हलके लढाऊ हेलिकॉप्टर विकसित केले जात आहेत, जे २०,००० फूट पेक्षा अधिक उंचीवर ऑपरेट करण्यास सक्षम असून, अधिक उंचीवर तुलनेने जड अपाचे हेलिकॉप्टर पेक्षा अधिक प्रभावी आहेत. भारतीय लष्कर आणि हवाई दल यांनी १५६ प्रचंड हे स्वदेशी हेलिकॉप्टर समाविष्ट करण्याची योजना आखली आहे.

भारताच्या प्रचंड या स्वदेशी लढाऊ क्षमतांवर लक्ष केंद्रित करताना, हवाई दलाचे आधुनिकरण आणि उंचीवर ऑपरेशन करण्यास सक्षम हेलिकॉप्टर विकसित करण्याचा उद्देश आहे. यामुळे भविष्यातील संरक्षणासाठी अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होईल आणि देशाची सामरिक स्वायत्तता वाढेल.